# पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
# नागपूर जिल्हा (ग्रामिण), नागपूर
# दिनांक ०३/०७/२०२२ (रविवार)

---

## ट्रॅक्टरची ट्रॉली चोरी

**पोलीस स्टेशन मौदा_:-** अंतर्गत मौजा मोहाडी शिवार १५ किमी पुर्व. यातील फिर्यादीने आपल्या ट्रॅक्टरची निळ्या रंगाची ट्रॉली क्र एम एच ४० बी ई ८३५९ ही आपल्या मोहाडी शेत शिवारात शेतात काढून ठेवली असता कोंणीतरी अज्ञात चोराने दिनांक ३०/६/२०२२ चे १८/३० ते ०१/७/२०२२ चे ०९/०० वा दरम्यान ट्रॉली क्र एम एच ४० बी ई ८३५९ किमती ५०,०००/रु ची चोरून नेली.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे- राजकुमार ईस्तारी आकरे वय ४० वर्ष रा मोहाडी यांचे रिपोर्टवरुन पो. स्टे. मौदा येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३७९ भादवि अन्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास- सहायक पोलीस निरीक्षक सोनेकर मो ८९७५९२१७७० हे करीत आहे.

## अपघातात जखमी

**पोलीस स्टेशन काटोल :-** अंतर्गत मोक्षधाम समोर सावरगाव रोड काटोल ३ किमी उत्तर. यातील फिर्यादी हे आपले मित्राचे मोसा क्र एम एच ४० बीएक्स -२२७३ ने डबलसीट काटोलवरून सावरगाव येथे जात असता, काटोल मोक्षधाम समोर सावरगाव रोडवर येणा-या ऑटो क्र. एम. एच. ४० बी एफ- ०४३६ चे चालकाने आपले ताब्यातील ऑटो भरधाव वेगाने व निष्काळजीपने चालवून फिर्यादीचे ताब्यातील मोटर सायकल ला धडक दिली. त्यामुळे फिर्यादी व त्याचा मित्र सलमान याला जखमी होण्यास कारणीभुत झाला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे - आकाश मनोहर भांगे वय २९ वर्ष रा. सावरगाव ता. नरखेड यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. काटोल येथे आरोपीविरूध्द कलम २७९,३३७,३३८ भादवी सह कलम १८४ मोवाका अन्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास- म पो हवा/ ज्योती सेवतकर मो नं. ९५५२५५६३४१ करीत आहे.

## अपघातात मृत्यु

**पोलीस स्टेशन कोंढाळी :-** अंतर्गत मौजा चाकडोह ७ किमी पुर्व. यातील मृतक आरोपी नामे- दादाराव नथ्थुजी दुपारे वय ४५ वर्ष रा. आठवा मैल नागपुर यांनी आपली ताब्यातील मोटर सायकल क्र एम एच ३१ डी बी ५९१२ हे वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन वाहनावरील अचानकपणे संतुलन सुटल्याने अपघात झाला त्यात आरोपी मृतक हा स्वता गंभीर जखमी होवुन उपचारादरम्यान मरण पावला.

सदर प्रकरणी फिर्यादी सरतर्फे पो.हवा भोजराज तांदुळकर पोस्टे कोंढाळी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कोंढाळी येथे मृतक आरोपीविरूध्द कलम २७९,३०४ अ भादवि सहकलम १८४ मोटर वाहन कायदा अन्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास- पोलीस उपनिरीक्षक पोलीस राम ढगे मो नं ९५१८९७९४९९ हे करीत आहे.

## आत्महत्या करण्याचा प्रयत्न

**पोलीस स्टेशन रामटेक** :— अंतर्गत संस्कृत विद्यापीठ रामटेक २ किमी दक्षिण, यातील आरोपी नामे— मोहम्मद सर्फराज मोहम्मद कुरबान अली वय २३ वर्षे रा. सालगोरी जिल्हा किसनगंज राज्य बिहार यांने दिनांक ०१/०७/२०२२ चे १४:०० वा.ते १४:३० वा. दरम्यान कोणत्यातरी अज्ञात कारणावरून विष प्राशन करून तो आपल्या मोटार सायकल ने नगरधन ते मौदा रोडवर संस्कृत विद्यापिठ समोर दुसऱ्या मोटर सायकल ला धडक दिल्याने आरोपी हा जखमी झाल्याने त्याचा उपचार कामी उपजिल्हा रूग्णालय रामटेक येथे भर्ती केले.

सदर प्रकरणी फिर्यादी सरतर्फे पोलीस उपनिरीक्षक .श्रीकांत लांजेवार पो.स्टे.रामटेक यांचे रिपोर्टवरून कलम ३०९ भादवि अन्वयें दाखल करण्यात आला. सदर गुन्हयाचा पुढील तपास— पो हवा/ मनोहर राउत पोलीस स्टेशन रामटेक मो.न. ९४२३६२८३०७ हे करीत आहे.

## दुखापत

**पोलीस स्टेशन सावनेर** :— अंतर्गत वडार झोपडपटटी सावनेर ०१ कि.मी दक्षिण. दिनांक ०२/०७/२२ चे २१/३० वा दरम्यान, यातील फिर्यादी हा आपल्या घरी जेवन करत असता यातील आरोपी नामे— मूकेश मरस्कोल्हे रा,पहलेपार आय टी आय समोरील वडार झोपडपटटी सावनेर याने त्याच्या घरा समोरील रोडवर येवून फिर्यादीस आवाज देवून फिर्यादी हा घराबाहेर आला असता, आरोपीने त्यास म्हटले की, तू मला शिवागाळी का केले? असे म्हणून रोडवर पडलेला दगड हातात उचलून फिर्यादीच्या डोक्यावर फेकून मारल्याने फिर्यादीचे डोक्याचे मागच्या बाजूला मार लागून जखमी केले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— प्रेम पवन पंचेश्वर वय १६ वर्ष रा, पहलेपार आय टी आय समोरील वडार झोपडपटटी सावनेर यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. सावनेर येथे कलम ३२४, ५०६ भादवी चा गुन्हा दाखल करण्यात आला. सदर गुन्हयाचा पुढील तपास पो हवा प्रकाश नांदूरकर मो क्र ८६०५३८१५९० हे करीत आहे.

**पोलीस उपनिरीक्षक भारत थिटे**
**मो क्र ९४२२६१४६३३**
**पोलीस माहीती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण),नागपुर**